# बदामीच्या चालुक्यांचे प्राचीन भारतीय इतिहासाच्या पुनर्लेखनातील महत्व

**डॉ. एस. आर.कट्टीमनी,**
सहाय्यक प्राध्यापक,
इतिहास विभाग प्रमुख ,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)
शिवाजी विद्यापीठ संलग्नित, महाराष्ट्र

**घोषवारा-**

*कोणत्याही देशाच्या सांस्कृतिक वारश्यामध्ये तेथील सामाजिक - धार्मिक चालीरीती रूढी परंपरा, भाषा व इतिहास यांचा समावेश होतो. देशाच्या सामाजिक व सांस्कृतिक वारश्यामुळे आर्थिक विकासाला चालना मिळते. प्राचीन भारतात अनेक राजे व राजवटी होऊन गेले. ज्यामध्ये मौर्य, गुप्त, शक, कुशाण, वाकाटक, सातवाहन, राष्ट्रकूट, चालुक्य व पल्लव यांचा समावेश करता येईल. या ऐतिहासिक राजवटीनी उत्कृष्ट प्रशासन व कला, स्थापत्य, साहीत्यातील प्रगती द्वारे तत्कालीन जगाला प्रभावित केले होते. ज्यांचा गौरवशाली इतिहास आजही आपणास अभिमानास्पद आहे. यापैकी बदामीचे चालुक्य हे एक महत्वपूर्ण ऐतिहासिक घराणे होऊन गेले. ज्यांच्या कला, साहित्य व स्थापत्यातील प्रगतीमुळे प्राचीन भारताच्या इतिहासाचे पुनर्लेखन करणे शक्य झाले आहे. प्रस्तुत शोधनिबंधातुन बदामीच्या चालुक्यांचे प्राचीन भारतीय इतिहासाच्या पुनर्लेखनातील महत्व विशद करण्याचा प्रयत्न केला आहे.*

***कळीचे शब्द-*** *सांस्कृतिक वारसा , ऐतिहासिक राजवटी, कला व स्थापत्य, इतिहासाचे पुनर्लेखन...*

**प्रस्तावना-**

कल्याणीच्या चालुक्य राजाच्या दरबारी कवी असणाऱ्या बिल्हणं यांनी विक्रम चरित्र या मध्ये चालुक्यांचे मूळ निवासस्थान आयोध्या असल्याचे म्हंटले आहे. काही इतिहासकारांच्या मते चालुक्यांची उत्पत्ती ही गुर्जरांशी संबंधित असल्याचे भाकीत केले आहे. डॉक्टर व्ही. ए. स्मिथ यांच्या मते चालुक्यांची उत्पत्ती ही चापा व उत्तरेतील परकीय जमात गुर्जर यांच्याशी संबंधित आहे.

बदामीच्या चालूक्यानी मलप्रभा नदीच्या काठावर बदामी, बनशंकरी, हम्पी, ऐहोळ, पट्टदकल व होस्पेट या याठिकाणी व्यापारी व स्थापत्य कलेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मंदिराची रचना केली.

सध्याच्या कर्नाटकातील मलप्रभा नदीच्या काठावर इसवी सन पूर्व 200 पासून मानवी वास्तव्याचे अवशेष व त्याच्या दैनंदिन वापरातील वस्तू व हत्यारे उत्खननातून प्राप्त झालेली आहेत. येथे प्राप्त होणारा लाल स्टँडस्टोन या दगडानी बनलेल्या पर्वत रांगा मुळे विशेषतः याच भागात मंदिरांची रचना केली गेली आहे. टॉलेमीने आपल्या " A Guide to Geography " ग्रंथात उपरोक्त चालुक्यकालीन शहरे ही व्यापारीदृष्ट्या महत्त्वाचे असल्याचे कथन केले आहे. पट्टदकल्ल येथे प्राप्त झालेल्या इ. स.1162 मधील एका शिलालेखावरून व तसेच सिंगीराजू पुराणावरून नंद व मौर्य घराण्यांच्या राजांनी त्यांच्या राज्याभिषेकाचा महोत्सव "पट्टा बंद महोत्सव" म्हणून साजरा केल्याचे उल्लेख केले आहे.

इसवी सनाच्या सहाव्या ते आठव्या शतकामध्ये दक्षिणेतील एक महत्त्वपूर्ण राजकीय सत्तेचे केंद्र म्हणून बदामीच्या चालुक्यांना ओळखले जाते. चालुक्यकालीन शिलालेखांमुळे, नाण्यांमुळे व इतर साहित्यिक व पुरातत्वीय उपलब्धतेमुळे दक्षिण भारताच्या इतिहासाची पुनर्रचना व पुनर्लेखन करणे शक्य झाले आहे. चालुक्यांच्या उत्पत्ती संबंधी इतिहासकारांमध्ये मतमतांतरे व विवाद असल्याचे दिसून येते.

**पुरातत्वीय उत्खननातून प्राप्त अवशेष -**

पश्चिमेकडील चालुक्यांची राजधानी बदामी ही होती. चालू के राजा पुलकेशी पहिला याने इसवी सन 543

मध्ये बदामी येथे एक किल्ला बांधला. जवळच असलेल्या ऐहोळ येथे व्यापारी श्रेण्या असल्याने त्यास महत्त्व प्राप्त झाले होते. ऐहोळ व पट्टदकल्ल येथे झालेल्या पुरातत्त्वीय उत्खननातून उत्तर पुराश्मयुगीन व नवाश्मयुगीन मानवी जीवनाचे व स्थित्यंतराचे पुरावे उत्खननातून प्राप्त झालेली आहेत.

ज्यामध्ये सिद्धनकोळा येथे मध्याश्मयुगीन व ऐहोळ येथे गुहेतील भित्तिचित्रे इसवी सन पूर्व 15000 ते इसवी सन पूर्व 300 या काळातील भित्तीचित्रे उत्खननातून प्राप्त होतात. तसेच सभोवताली दगडी हात कुऱ्हाडी व जनावरांच्या हाडांचे अवशेषही उत्खननातून प्राप्त झालेले आहेत. महापाषाण युगीन मानवाच्या मृतक अवशेष म्हणजेच मृतांना पुरून ठेवल्याचे अवशेष या भागातील उत्खननावरून प्राप्त होतात.

ऐहोळ येथे उत्खननातून प्राप्त झालेल्या तांब्याच्या नाण्यांवरून व तसेच पट्टदकल्ल येथे प्राप्त झालेल्या मराठी नाण्यांवरून बदामी, ऐहोळ व पट्टदकल्ल या भागामध्ये चालुक्यापूर्वी सातवाहन राजे राज्य करीत होते असे इतिहासकाराने मान्य केले आहे. उत्खननात प्राप्त झालेल्या काही शिलालेखांवरून सातवाहनांनंतर कदंब यांचे राज्य उपरोक्त भागात असल्याचे पुरावे मिळतात. यानंतर मात्र दक्षिणेतील चालुक्यांनी आपली सत्ता इसवीसन सहाव्या शतकात बदामी येथे प्रस्थापित केली.

**चालुक्यांची राजकीय कारकीर्द**

बदामीच्या चालुक्यांच्या संस्थापक राजा जयसिंह याला मानले जाते. यानंतर राजा रणारगाने चालुक्यांची शक्ती व राज्य विस्तारण्याचे काम केले. परंतु या दोन चालुक्य राजाबद्दल ऐतिहासिक लिखित माहिती खूप कमी प्रमाणात उपलब्ध होते.

इसवी सन 543 ते 66 या काळात पुलकेशिन-I ज्याने बदामी येथे राजधानीची निर्मिती केली. पुलकेशिन-I याचा पुत्र व उत्तराधिकारी किर्तीवर्मन पहिला याने कदंबच्या वनवासी व नल क्षेत्रामध्ये आपल्या राज्याचा विस्तार केला. कीर्तीवर्मनच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा पुलकेशिन II हा अल्पवयीन असल्याने त्याचा भाऊ मंगलेश हा राजा बनला. याने गुजरात, खानदेश व माळवा या क्षेत्राला जिंकून घेण्याचे काम केले.

**पुलकेशिन-II**

यानंतर इसवी सन 610 ते 642 या काळामध्ये चालुक्यांचा महान राजा पुलकेशिन-II हा सत्तेवर आला. याला सुरुवातीस सत्ता प्राप्त करण्यासाठी म्हणून मंगलेश या त्यांच्या काकांबरोबर संघर्ष करावा लागला. यावेळी जनतेचाही रोष स्विकारावा लागला. परंतु या सर्व विद्रोह अण्णा शांत करण्याचे काम पुलकेशी द्वितीय याने केले. याने कदंबाचे वनवासी, दक्षिण मैसूर प्रांतातील गंग, उत्तरेतील लट्ठ, माळवा व गुर्जर हा भाग जिंकून घेतला. उत्तर भारतातील श्रेष्ठ राजा हर्षवर्धन याचा त्यांनी नर्मदाकाठी पराभव केला. ज्याचा उल्लेख रवी किर्ती याने ऐहोळ शिलालेखामध्ये केलेला आहे. पूर्व दक्षिणेतील कोसल, कलिंग, पिष्टपूर व रॉयल सीमा यांनाही पुलकेशिन द्वितीय याने आपले मांडलिक बनवले. कांचीच्या पल्लव राजा महेंद्रवर्मन-I बरोबर झालेल्या पहिल्या युद्धात त्याचा विजय झाला. परंतु दुसऱ्या युद्धात पल्लव राजा नरसिंहवर्मन-I याने पुलकेशिन द्वितीय याचा पराभव करून त्याची हत्या केली व बदामी वर अधिकार प्राप्त केले.

**उत्तर चालुक्यराजे**

यानंतर विक्रमादित्य-I या चालू की राजाने बारा वर्षांच्या पल्लवांच्या राजवटीला झुगारून देऊन, त्यांचा पराभव करून वडिलांच्या मृत्यूचा बदला पल्लवाकडून घेतला. व पुन्हा एकदा चालुक्यांची राजवट बदामी येथे प्रस्थापित केली. यानंतर विनयादित्य या चालूक्य राजाने शांतीपूर्ण राज्य केले. इसवी सन 693 ते 733 या काळात राजा विजयादित्यने चालुक्यांवर राज्य केले. या काळात सर्वात जास्त मंदिरांची निर्मिती झाल्याचे दिसून येते. हा काळ चालुक्य राजवटीच्या दृष्टीने शांती, समृद्धी व भरभराटीचा होता. इसवी सन 744 ते 755 या काळात राज्य करणारा चालुक्य राजा कीर्तीवर्मन द्वितीय याचा पराभव राष्ट्रकूटांचा संस्थापक दंतिदुर्ग याने केला व याबरोबरच बदामीच्या चालुक्यांचा शेवट झाला.

चालुक्यकालीन मंदिर स्थापत्यकला-

चालुक्यांनी मंदिर स्थापत्य कलेमध्ये वेसर शैलीचा विकास केला. चालुक्य काळात सिमेंट शिवाय दगडांना जोडून भवन निर्माण करण्याची कला दक्षिणेत निर्माण झाली. या काळात अनेक बौद्ध, जैन व हिंदू धर्मीय लेण्यांची निर्मिती

झाली. स्थापत्य कलेमध्ये भिंतींवर धार्मिक व अन्य चित्रांद्वारे सजावटी केल्या गेल्या.

अजिंठा येथे लेण्यामध्ये पुलकेशीन-II याने इराणी राजदुतांचे स्वागत केल्याचे दृश्य भित्तिचित्राच्या माध्यमातून आपणास पाहायला मिळते. चालुक्यकालीन ऐहोळ हे मंदिरांचे शहर म्हणून ओळखले जाते. ज्यामध्ये सत्तरहून अधिक मंदिरांची निर्मिती केली गेली आहे. बौद्ध चैत्याचे रूपांतरण ब्राह्मण मंदिरात केल्याचे दुर्गा मंदिरावरून समजते. सपाट छताचा लाडखा मंदिर आपले भिन्नत्व सिद्ध करते. मेगुती येथील जैन मंदिर स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. पट्टदकल्ल येथील पापनाथ मंदिर हे उत्तरेकडील नागर शैलीचे व दक्षिणेकडील द्रविड शैली चे संमिश्रण आहे. विक्रमादित्य-II च्या राणीने येथेच विरूपाक्ष मंदिर बनवले आहे. जे कांचीच्या कैलाशनाथ मंदिराची हुबेहुब प्रतिमा दिसते.

**चालुक्यांचा धर्म-**

चालुक्य राजांच्या उत्पत्ती संबंधी जरी इतिहासकारांमध्ये भेद असले तरी त्यांचा धर्म ब्राह्मणवादी हिंदू असल्याचे इतिहासकार मान्य करतात. परंतु चालुक्य राजे हे धर्मसहिष्णू होते. त्यांनी आपल्या राज्यात बौद्ध व जैन धर्मीय लोकांना धर्माचे वहन करण्यासाठी परवानगी दिली होती. त्यांच्या धर्मसहिष्णूतेचे उदाहरण म्हणजे त्यांनी निर्माण केलेल्या बौद्ध व जैन लेण्या होय. या काळात विशेषतः ब्राह्मण धर्माचे प्रस्थ वाढले. विविध वैदिक बळी व कर्मकांडांना महत्त्व प्राप्त झाले. पुलकेशीन-I याने अश्वमेध यज्ञ करून वेदिक यज्ञाचे महत्व वाढवले. हिंदू धर्मातील देवी - देवता जसे की शिव, विष्णू व इतर स्त्री देवता, यक्ष व गंधर्व देवतांचे चित्रण चालुक्यकालीन मंदिर स्थापत्यामध्ये व स्तंभावरती पाहायला मिळते.

**चालुक्यांची प्रशासन व्यवस्था-**

बदामीच्या चालुक्यांच्या केंद्रीय प्रशासन व्यवस्थेमध्ये ग्रामीण प्रशासन व्यवस्थेला महत्व दिले गेले होते. बदामीच्या चालुक्यांची सामुद्रिक शक्ती देखील महत्त्वपूर्ण आहे सिद्ध झाली होती . चालुक्य राजा पुलकेशीन-II याने 100 जहाजाद्वारे आक्रमण करून विजय प्राप्त केल्याचे उल्लेख आहेत. सामंतांनी सैनिकी व प्रशासकीय मदत करून आपले महत्व चालुक्य काळात टिकवून ठेवले होते.

**निष्कर्ष-**

चालुक्यांच्या राज्यात मोठ्या दगडांच्या पर्वतरांगा असल्याने उपजाऊ जमीन खूपच कमी होती.त्यामुळे त्यांच्या राज्याचे कृषी उत्पन्न खूप कमी होते. म्हणूनच चालुक्य राजांनी नेहमी सीमावर्ती राज्यांवर आक्रमणे केली. या काळात एकूणच व्यापार वाणीज्याचा ऱ्हास झाल्याने सतत एकमेकांवर आक्रमण करून लुटमारी द्वारे राज्याचे उत्पन्न वाढवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. अशातच राष्ट्रकूटांबरोबर झालेल्या संघर्षामध्ये राष्ट्रकूट राजा दंतिदुर्ग याने चालुक्यांचा पराभव करून त्यांचे राज्य व राजवट संपुष्टात आणली.

असे असले तरी चालुक्य कालीन कला व स्थापत्य राजाश्रयाबरोबरच लोकाश्रयाच्या माध्यमातून प्रगत बनल्याचे दिसून येते. चालुक्यकालीन मंदिर स्थापत्य कला व लेण्यांच्या निर्मितीच्या कलेपाठीमागे धार्मिक प्रेरणा कारणीभूत होती. म्हणूनच या काळात सर्व धर्मीय स्थापत्याचा सारखा विकास झाल्याचेही आपणास प्रत्ययास येते. एकूणच चालुक्यकालीन राजवटीमध्ये राजे हे कलाप्रेमी असल्याने व त्यांनी भक्कम सैनिकी व्यवस्थेद्वारे राजकिय शांतता प्रस्थापित करून राज्यांतर्गत शांतता सुव्यवस्था व उत्कृष्ट प्रशासन निर्माण केले त्यामुळे कलेच्या विकासातही महत्वपूर्ण घडामोडी घडल्या. थोडक्यात, चालुक्य राजवटीच्या राजकीय प्रशासकीय मंदिर स्थापत्य व शिलालेखांवरून पूर्व मध्यकालीन दक्षिण भारतीय इतिहासाचे पुनर्लेखन व पुनर्रचना करता येते. सध्याच्या काळात उपरोक्त शहरांची गणना पर्यटन स्थळांमध्ये केल्याने यांना पर्यटनाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

शेवटी निश्कर्षामध्ये असे म्हणता येईल की, भारतीय प्राचीन इतिहास लेखन परंपरेतील वस्तुनिष्ठ इतिहास लिहायचा झाल्यास त्यासाठी चालुक्यकालीन शिलालेख, उत्खननातून प्राप्त नाणी, हत्यारे, साहित्यिक स्त्रोत व मंदिर स्थापत्याचा आधार घ्यावा लागतो. तरच प्राचीन भारतीय समृद्ध ऐतिहासिक घटितांचे वस्तुनिष्ठ पुनःर्लेखन करता येईल.

**संदर्भ साधने-**

1. गोखले शोभना (2007), पुराभिलेखविद्या, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, द्वितीय आवृत्ती, पुणे.
2. कठारे अनिल (2001), प्राचीन भारत, कल्पना प्रकाशन, नांदेड.

3. कोलारकर श. गो. (1999), प्राचीन भारताचा राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक इतिहास, मंगेश प्रकाशन, नागपूर.
4. जोशी पी. जी. (2003), प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर.
5. सिंगारे अनिल (1997), दक्षिण भारताचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद
6. Majumdar Ramesh Chandtra, Ancient India, Motilal Banarasidass Publication, Delhi - 1952.
7. Sundara A (1974) , *Pattadakal,* IBH Publication, Bangalore.
8. Ramesh K .V. (1984), *The Chalukyas of Vatapi,* Agam Prakashan, New Delhi.
9. Venkateshaiah S V et.al (2003-05), Brief Report on the preliminary exploration and discovery of the Ancient Quarry site near Pattadakal. *Excavation at Pattadakal.*
10. George Michell (2002), *Monumental Legacy ,Pattadakal* **,**Oxford University Press, Delhi
11. Cousens H (1926), *The Chalukyan Architecture of the Canerese Districts*, Calcutta Govt. of India.